International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 2 January – February - 2026

# कोल्हापूर जिल्ह्यातील पायाभूत सुविधा आणि संसाधने

**डॉ. आर. के. शानेदिवाण**

*प्राचार्य, श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर*

***Corresponding Author – डॉ. आर. के. शानेदिवाण***

**DOI - 10.5281/zenodo.18477271**

सध्याच्या युगात 'इन्फ्रास्ट्रक्चर' हा शब्द परवलीचा झाला आहे. मराठीमध्ये या शब्दाचा अर्थ 'पायाभूत सुविधा' असा होतो. पायाभूत म्हणजे अशा सुविधा ज्यांचे असणे अनिवार्य आणि अपरिहार्य आहे. हा शब्द सर्व तऱ्हेच्या विकास कल्पनेमध्ये महत्त्वपूर्ण आहे. पायाभूत सुविधा म्हणून केवळ देश विकासाचा विचार करून चालणार नाही तर अशी प्रत्येक व्यवस्था जी देश विकासामध्ये योगदान देते. या दृष्टीने 'पायाभूत' हा शब्द व्यापक अर्थाचे प्रतिनिधित्व करतो. सामान्यपणे या संकल्पनेमध्ये भौतिक व सामाजिक सुविधांचा विचार प्रामुख्याने होतो. भौतिक सुविधांमध्ये स्तरानुरूप सुविधांचा विचार होतो. जसे देशाच्या संदर्भात रस्ते, विमानतळ, रेल्वे, मेट्रो, पाण्याची व्यवस्था, समुद्रतट बंदरे तर सामाजिक स्तराचा विचार शिक्षण, आरोग्य, पर्यावरण या बाबींना नजरेसमोर ठेवून होतो.

व्यवस्था कोणतीही असो, त्याचे योग्य व्यवस्थापन होणे अत्यावश्यक असते. व्यवस्थापन म्हणजे उपलब्ध असणाऱ्या संसाधनांचा आवश्यक्तेनुसार वापर व उपयोग कसा करायचा याची तज्ज्ञांच्या माध्यमातून केलेली आखणी होय. अगदी घरातील कामापासून ते राष्ट्राच्या उभारणी संदर्भात व्यवस्थापन ही संकल्पना मान्य झाली आहे. प्रत्येक व्यक्ती त्यांच्या त्यांच्या आकलन आणि कुवतीनुसार व्यवस्थापन करते. प्रत्येकाचा हेतू हाती घेतलेले कार्य व्यवस्थीत पार पडावे हाच असतो. व्यवस्थापनामध्ये सुलभता येण्यासाठी आवश्यक सुविधा असणे महत्त्वाचे ठरते. विशेषत: पायाभूत सुविधांची वानवा असेल तर अपेक्षित परिणाम साधण्यामध्ये अडथळे निर्माण होतात. साधनांचा, सुविधांचा विचारही आपण कशासंदर्भात विचार करीत आहोत त्यावर अवलंबून असतो. राष्ट्राचा विचार करताना रस्ते, बंदरे, विमानतळ, आरोग्य, शिक्षण या बाबींना प्राधान्य असते. पण गावस्तरावरील सुविधांचा विचार करताना स्थानिक बाबींना विचारात घेऊन निर्णय घ्यावे लागतात. या दृष्टीने कोल्हापूर जिल्हा आणि शहर यांमधील पायाभूत सुविधा आणि व्यवस्थापन याचा विचार करणे शक्य आहे.

कोल्हापूर जिल्ह्यासंदर्भातील विविधांगी नोंदी मांडून या संदर्भातील निरीक्षणे नोंदवावी लागतील.

1) कोल्हापूर शहर आणि कोल्हापूर जिल्ह्यातंर्गत 12 तालुक्यांचा समावेश होता.
2) लोकसंख्येचा विचार करता शहराची लोकसंख्या 2011 च्या जनगणनेनुसार 549236 इतकी होती. मागील 15 वर्षांचा आढावा घेतला तर साधारणपणे लोकसंख्येमध्ये लक्षणीय वाढ झाली असून सद्यस्थितीत 8 लाखांहून अधिक लोकसंख्या असावी असे मानले जाते.

3) कोल्हापूर जिल्ह्याची लोकसंख्या 2011 च्या जनगणनेनुसार 8 लाख 76 हजचार इतकी होती. मागील 15 वर्षांमध्ये लक्षणीय वाढ झाली असून सद्यस्थितीत 42 लाखाहून अधिक लोकसंख्या असावी.
4) कोल्हापूर परिसरात एक विमानतळ आहे.
5) कोल्हापूर शहर व जिल्ह्यामध्ये सहकाराचे विस्तृत जाळे आहे.
6) कोल्हापूर शहरामध्ये उच्च शैक्षणिक संस्थांसह शिवाजी विद्यापीठ आहे.
7) कोल्हापूर व इचलकरंजी येथे महानगरपालिका आहे. जिल्ह्यामध्ये 11 नगरपरिषदा आहेत.
8) कोल्हापूर परिसरातील मोठ्या व मध्यम आकाराच्या धरणांची संख्या 13 इतकी आहे. याशिवाय उपलब्ध माहितीनुसार 60 लहान जलसाठा प्रकल्प आहेत.
9) राधानगरी, काळम्मावाडी, तुळसी, कासारी, राजाराम ही मोठी धरणे असून या पाण्याचा वापर शेती, सिंचन व पिण्यासाठी होतो.
10) उर्जेच्या गरजा भागविण्यासाठी बायोगॅस, सौरउर्जा, को-जनरेशन प्रकल्प हे प्रकल्प पारंपरिक व नवीकरणीय अशा दोन्ही प्रकारात आहेत.
11) पंचगंगा, दुधगंगा, वारणा, भोगावती, कासारी, वेदगंगा, कुंभी या नद्या आहेत.
12) उपलब्ध माहितीनुसार कोल्हापूर जिल्ह्यामध्ये 23 निमशहरांची नोंद आहे. गावांची संख्या साधारणपणे 1239 इतकी आहे. ही नोंद ग्रामपंचायत हद्दीत नोंद असणाऱ्या गावांची आहे. 2011 च्या जनगणनेनुसार ही संख्या 1216 आहेत.

कोल्हापूर जिल्ह्याचा भौगोलिक विस्तार नजरेसमोर आणला तर चंदगड तालुका बेळगांव जिल्ह्याशी संलग्न आहे तर राधानगरी तालुका कोकणशी भिडलेला आहे. विस्तारीत भागामध्ये शाहुवाडी, शिरोळ आहे. सामान्यपणे सह्याद्री पर्वतरांगासह डोंगरमाथ्याने कोल्हापूर जिल्ह्याला वेढलेले आहे. जिल्ह्याचा बहुतांष भाग सधन आहे. गगनबावडामध्ये अतिरिक्त पर्जन्यमानाचा प्रभाव जाणवतो. पिकस्थिती समाधानकारक असून सद्यस्थितीत ऊसशेतीचे प्रमाण लक्षणीय आहे. पन्नास वर्षांपूर्वी दुधगंगा परिसरामध्ये धरणामुळे पाण्याचा तुटवडा जाणवत होता पण काळम्मावाडी व राधानगरी धरणामुळे पिण्यासाठी तसेच शेतीसाठी मुबलक पाणी उपलब्ध झाले आहे. पूर्वी पाणी नव्हते म्हणून चिंता होती पण सध्या पाण्याच्या अतिरिक्त वापरामुळे शेतीचे नुकसान होत आहे. सर्वसाधारणपणे असे म्हणता येईल की, कोल्हापूर शहर व जिल्ह्याचा समावेश सधन आर्थिक गटामध्ये होतो.

रस्ते व दळणवळणाची साधने सुस्थितीत असणे हा विकासाचा चेहरा असतो. रस्त्यांची दयनीय अवस्था दीर्घकाळ या परिसराने अनुभवलेली आहे. आजही शहरामध्ये फारशी समाधानाची परिस्थिती नाही. रस्त्यांचा दर्जा, देखभाल या संदर्भात अक्षम्य हेळसांड आहे. ग्रामीण भागत तर चांगला रस्ते शोधून सापडणार नाही अशी स्थिती आहे. गेल्या कांही वर्षात राज्य व राष्ट्रीय महामार्गाची दुरूस्ती होत आहे पण ग्रामीण भागाला जोडणारे रस्ते खड्डेयुक्तच आहेत. कोल्हापूर-गारगोटी रस्ता, कोल्हापूर-राधानगरी रस्ता सध्या ठीक आहे पण त्याला जोडणाऱ्या सर्व्हिस रस्त्यांची स्थिती दयनीय आहे. कोल्हापूर-सांगली कडे जाणारा रस्ता दुरूस्तीच्या प्रतिक्षेत आहे. चांगले रस्ते असतील तर वाहतूक आणि व्यापार अशा दोन्ही स्तरावर प्रगती जाणवते. कोल्हापूर जिल्ह्याची परिस्थिती समजून घेतली तर वाहतूक करणाऱ्या मालगाड्यांची संख्या खूप आहे. साखर कारखान्यांसाठी ऊस वाहतूक करणारे वाहन तर आहेतच पण त्याहीपेक्षा खाजगी वाहनांची संख्या लक्षणीय आहे. पण या तुलनेत सुविधा अत्यल्प आहेत.

अन्य राज्यांमध्ये प्रवास करताना याचा अनुभव येतो. अगदी कागलच्या पुढे कर्नाटक राज्यामध्ये प्रवास करताना हा फरक जाणवतो. असे म्हणतात की, दरडोई उत्पन्नात कोल्हापूर परिसर सर्वात पुढे आहे पण त्या तुलनेत रस्ते, दळणवळणाची सुविधा समाधान देत नाही.

कोल्हापूर जिल्ह्यातील बहुतांष गावांचा संपर्क शहर व निमशहराशी येतो. कोणतेही गांव शहरापासून वंचित राहिलेले नाही. याचा कमी अधिक प्रमाणात नफा व तोटाही जाणवतो आहे. शहरीकरण होऊ लागल्याने गावाचा चेहरामोहरा बदलतो आहे. शहरातील भौतिक साधने ग्रामीण भागात विस्तारत आहेत. शहरी सुविधा सहजपणे उपलब्ध होत आहेत. शिक्षणाचा विचार केला तर सुविधा सहजपणे उपलब्ध होत आहेत. कोल्हापूर जिल्ह्यातील अगदी अपवादात्मक भागात किमान प्राथमिक शिक्षण उपलब्ध नाही अशी परिस्थिती जाणवते. विशेषत: कांही वाड्या-वस्त्यांवर अशी परिस्थिती आहे. सर्व गावात अंगणवाडी, प्राथमिक म्हणजे 4 थी पर्यंत शिक्षण आहे. जवळच्या गावांना एकत्रित सुविधा म्हणून हायस्कुल उभी राहिली. तशीच परिस्थिती कनिष्ठ महाविद्यालयांची आहे. गेल्या कांही काळात वरिष्ठ महाविद्यालयांची संख्याही नजरेत भरण्यासारखी आहे पण; गुणवत्तेचा विचार केला तर निराशा पदरी पडते.

शाळा सुरू आहेत पण पायाभूत सुविधांची वानवा असणाऱ्या अनेक शाळा आहेत. वीज, पाणी, इमारत सुस्थितीत नाही. विद्यार्थ्यांना खेळासाठी मैदान नाही. खेळाची साधने नाहीत अशाही अनेक शाळा आहेत. विद्यार्थ्यांना शासनस्तरावर दिल्या जाणाऱ्या सुविधा नीटपणे पोहचत नाहीत. पुस्तके, गणवेश देण्यामध्ये अनास्था जाणवते. सध्याच्या काळात Computer, Internet अपरिहार्य बनले आहे. पण अनेक शाळा, महाविद्यालयामध्ये संख्येच्या तुलनेत ही साधने अपुरी आहेत. कोल्हापूर जिल्ह्यातील कांही नवीन महाविद्यालयामधील भौतिक सुविधा पाहिल्या तर या संस्था कशासाठी उभ्या करण्यात आल्या आहेत असा प्रश्न पडतो. विज्ञान महाविद्यालयात प्रयोगशाळाच नसेल तर अशा शिक्षण संस्था कशासाठी आणि यांना परवानगी देताना कोणते निकष तपासले असा प्रश्न निर्माण होतो. अशा संस्थांमध्ये शिक्षण घेणारे विद्यार्थी गुणवान, प्रज्ञावान कसे होणार? हे थोडके म्हणून की काय अगदी प्राथमिक ते महाविद्यालयीन स्तरापर्यंत खाजगी कोचिंग क्लासेसचे पेव फुटलेले आहे. येथील भौतिक सुविधा पाहिल्या तर स्तिमित व्हायला होते. अक्षरश: खुराड्यात बसावीत तशी मुले-मुली बसतात. दुर्देव हे आहे की, शाळांपेक्षा खाजगी क्लासेसना मिळणारा प्रतिसाद उदंड आहे. एकंदरीत कोल्हापूर शहर व परिसरातील शाळा, महाविद्यालये या संदर्भात गांभीर्याने विचार करण्यासारखी परिस्थिती आहे.

सध्याच्या काळात पर्यावरणीय समतोल साधण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याची निकड प्रकर्षाने जाणवत आहे. पर्यावरणामध्ये पाणी प्रदूषण, हवा प्रदूषण, महापूर नियोजन, घरगुती सांडपाणी नियोजन, कचरा नियोजन या बाबींचा समावेश होतो. कोल्हापूर शहरामध्ये या सर्वच बाबींचा प्रश्न गंभीर बनला आहे. विशेषत: पाण्याचे प्रदूषण भयावह आहे. पाणी म्हणजे जीवन पण त्याकडे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे. कोल्हापूर शहराला पाणी पूरवठा करणाऱ्या भोगावती, पंचगंगा या नद्यांच्या पात्रामध्ये बिनदिक्कतपणे साखर कारखान्यांची मळी व तत्सम रासायनिक द्रव्ये सोडण्यात येतात. यामुळे पाण्यातील जैवविविधता नष्ट होत आहे. कोल्हापूर शहरातील सांडपाणी व मैलामिश्रित पाणी पंचगंगा नदीत मिसळते. पण या संदर्भात महापालिका प्रशासन गांभीर्याने नियोजन करताना दिसत नाही. कचऱ्याचा प्रश्नही असाच गंभीर आहे. कचरा उठाव होण्यासह त्याची निर्गतही होणे गरजेचे आहे. मागील

काही काळात अगदी 2005 पासून तीन वेळा महापूराचे पाणी शहरासह ग्रामीण भागात घुसले. कित्येकांची गुरेढोरे प्राणांस मुकली. पण या संदर्भाने ठोस उपाययोजना झाल्याचे जाणवत नाही. सुदैवाने कोल्हापूर शहर व परिसरातील हवेचा दर्जा बरा आहे. पण सणासुदीच्या काळात हवेबरोबर आवाजाचेही प्रदूषण व्यक्तीच्या आरोग्यास हानी पोहचत असल्याचे जाणवते.

एकीकडे विकासाच्या नांवाखाली पायाभूत सुविधांची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन करायचे पण प्रत्यक्षात झाडांची कत्तल करून सिमेंटची जंगले उभी करायची ही आजची परिस्थिती आहे. शहरांची वाढ आकाशाच्या दिशेने होत असताना पाणी, वीज, रस्ते, पार्कींगची सोय आहे का याचा विचार होत नाही. कोल्हापूर शहराला राजर्षी शाहू राजांचा वारसा आहे. अंबाबाई तीर्थक्षेत्र आहे, विद्यापीठाचे मुख्य केंद्र आहे पण शहराच्या अंतर्गत रस्त्यांची अवस्था बिकट आहे. स्वच्छतागृहांची वानवा आहे. जागोजागी कचऱ्यांची कोंडाळी आहेत. पथदिव्यासह ट्रॅफीक यंत्रणा विस्कळीत आहे, खेळाची मैदाने नाहीत, कायदा सुव्यवस्था नीट नाही, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी नशेच्या अधीन होत आहेत ही सर्व परिस्थिती चिंताजनक आहे. विकास म्हणजे चकचकीतपणा नव्हे तर पायाभूत सुविधांसह नैतिकतेचे पालन करणारी व्यवस्था विकसित करणे होय. आणि हे होण्यासाठी जबाबदारीचे भान निर्माण होणे गरजेचे आहे.

कोल्हापूर शहराचा विचार करताना मूलभूत सोयी सुविधांची कमतरता प्रकर्षाने जाणवते. विशेषत: शहरातील ड्रेनेज व्यवस्था खूपच विस्कळीत आहे. नियोजन नसणाऱ्या बांधकाम यंत्रणेचा अतिरिक्त ताण या व्यवस्थेवर आहे. ही यंत्रणा खूप वर्षापासून कार्यान्वित आहे. जगभरामध्ये नवनवे तंत्रज्ञान विकसित होत आहे. या तंत्रज्ञानाचा वापर करून ही व्यवस्था नीट करावयास हवी. नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने ही बाब खूप महत्त्वाची आहे. त्याचबरोबर दळणवळणाची समस्या दिवसेंदिवस गंभीर बनत आहे. प्रचंड वाहतूक कोंडीचा सामना नागरिकांना करावा लागतो. यामुळे वेळ, पैसा, इंधन याचा अपव्यय तर होतोच पण त्याहीपेक्षा मानसिक ताणतणावाचा सामना करावा लागतो. शहराचे प्रश्न असे आहेत तर ग्रामीण भागाच्या समस्या आणखीणच गंभीर आहेत. ग्रामीण भाग आर्थिकदृष्ट्या सधन होत आहे. पण यांमुळे नवे प्रश्न निर्माण झाले. भौतिक समृद्धता आली आणि त्याबरोबर बार, धाबा संस्कृती आली. श्रमाचे मोल कळेनासे झाले. नवे तंत्रज्ञान इतके अंगवळणी पडले आहे की, हात, डोकं आणि हृदयाला कामच राहिले नसल्याची स्थिती आहे. नात्यागोत्यापेक्षा तात्कालीक बाबी महत्त्वाच्या ठरत आहेत. एकप्रकारचा उत्साही बिनडोकपणा वातावरणात भरल्याची जाणीव प्रबळ होत आहे.

कोल्हापूर शहर आणि जिल्ह्याच्या संदर्भात पायाभूत सुविधा आणि संसाधनांची उपलब्धता या अनुषंगाने उपलब्ध माहितीच्या आधारे वरील निरीक्षणे नोंदविता येतील. तथापि, पायाभूत सुविधांच्या अनुषंगाने सुधारणा होण्याच्या दृष्टीने कांही बाबतीत पुढाकार घेऊन त्याची अंमलबजावणी करता येईल.

**1) वाहतूक व्यवस्थेचे योग्य व्यवस्थापन:**

कोल्हापूर शहराची सातत्याने वाढ होत आहे. लोकसंख्येसह वाहनांच्या संख्येत भर पडत आहे. अशावेळी वाहतुकीचे नियमन किंवा व्यवस्थापन व्हावयास हवे. रस्ते, सार्वजनिक मार्ग, खाजगी वाहने, रस्त्यावरून जाणारे लोक, सायकल झोन आदि सर्वांचे नियमन आणि नियंत्रण होण्यासाठी परस्पर धोरणे समजून घेऊन समन्वय साधायला हवा. हे असे करण्याने अनेक बाबी साध्य होतील. जसे इंधनाची बचत होईल, वेळ वाचेल, अपघाताचे प्रमाण कमी होईल, ध्वनि व वायू प्रदूषण कमी होण्यास मदत होईल.

नियमनाच्या अंतर्गत सी.सी.टी.व्ही, जी.पी.एस. तंत्राचा वापर करता येणे सहज शक्य आहे. त्याचबरोबर सुनियोजनासाठी पार्कींग व्यवस्था अद्ययावत करण्याची गरज आहे. 'हॉकर्स झोन'साठी वेगळी व्यवस्था करून वाहतूकीसाठी अडथळा निर्माण होणार नाही याची खबरदारी घेता येईल.

**2) महापूर नियंत्रण:**

2005, 2019, 2021 साली कोल्हापूरला महापूराने वेढले. शेती, गुरे-ढोरे, मालमत्तेचे नुकसान झाले. ही परिस्थिती का उद्भवली याचा विचार होऊ लागला आणि अवैध बांधकाम, नदी पात्रामधील बांधकामे, वाळू उपसा, अतिक्रमण या बाबी ठळकपणे समोर आल्या. या संदर्भात गंभीरपणे उपाययोजना करणे शक्य आहे. विशेषत: नागरी वस्तीमध्ये नदी अथवा नाले पात्रास तटबंदी उभारणे, नदी पात्राची खोली वाढवणे, रेड झोन एरियाची काटेकोर अंमलबजावणी करणे, नालेसफाई करणे अशा बाबी कराव्या लागतील. याबरोबर लोकजागृती करण्यावर भर द्यावा लागेल.

**3) पंचगंगा प्रदूषण:**

मागील कांही वर्षामध्ये कोल्हापूरची अस्मिता असणारी पंचगंगा नदी जागतिक स्तरावर नको त्या कारणासाठी प्रसिद्ध झाली. जागतिक स्तरावरील सर्वेक्षणामध्ये सर्वात दूषित नद्यांमध्ये पंचगंगा नदीच्या प्रवाहाचा उल्लेख झाला. याची कारणे या परिसराशी निगडीत आहेत. पंचगंगेचे पाणी पिण्यासह, शेतीसाठी वापरतात. त्याचबरोबर उद्योगधंदे, विविध व्यवसायासाठी या पाण्याचा वापर होतो. शासकीय स्तरावर या नदीच्या प्रदुषणासंदर्भात वारंवार लोकजागृती होत असते पण त्याचा गंभीरपणे विचार होत नाही. शासनाने जागतिक स्तरावरील तंत्रज्ञानाचा वापर करून पंचगंगा नदी प्रदुषण कसे रोखता येईल याचा विचार करावयास हवा. पण त्याचबरोबर लोकांनीही या संदर्भात गंभीर होऊन प्रदुषण टाळणे अथवा कमी करणे या संदर्भाने स्वयंशिस्तीने पालन करावयास हवे.

**4) रस्त्यांचा दर्जा सुधारणे:**

स्वातंत्र्यपूर्व काळात महात्मा गांधी यांनी भारतीय समाजव्यवस्थेतील खेड्यांचे स्थान अधोरेखित केले होते. भारत हा खेड्यांचा देश आहे हे सांगताना खेडी स्वयंपूर्ण बनविण्यासाठी सर्वांनी विशेष प्रयत्न करावयास हवा असा संदेश त्यांनी दिला. गांधी विचारातील भारावलेपण काही काळ मोहित करणारे ठरले. जसजसे औद्योगिकीकरण वाढले तसतसे खेड्यांचे स्वरूप बदलले. खेडेपणा कमी होत जाऊन खेडी शहरीकरणाकडे वेगाने सरकली. जे जे शहरात ते ते खेड्यात अशी परिस्थिती आहे. आता या संदर्भात तक्रार करता येणार नाही किंवा नव्या व्यवस्थेला नकारही देता येणार नाही. पण कांही बाबतीत गंभीर व्हायला हवे. विशेषत: ग्रामीण भागातील रस्त्यांसंदर्भात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून विचार व्हायला हवा. करेक्टीव्हीटी वाढण्यासह दर्जा सुधारायला हवा. शरीरात जशा नसा सगळीकडे रक्ताचा प्रवाह सुरळीतपणे पोहचवितात. तसाच प्रकार ग्रामीण भागातील रस्त्यांसंदर्भात होतो. रस्ते चांगले असतील तर दळणवळण, व्यापार याला गती मिळते.

**5) पाणी नियोजन:**

पाण्याचे सुव्यवस्थित नियोजन होणे अत्यंत गरजेचे आहे. विशेषत: कोल्हापूर शहरासाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था कळंबा तलाव, शिंगणापूर-चंबुखडी या योजनेतून पूर्वापार होत आहे. यासाठीची यंत्रणा निर्माण होऊन खूप कालावधी लोटलेला आहे. यासाठीची यंत्रणा निर्माण होऊन खूप कालावधी लोटलेला आहे. ज्यावेळी या योजनेची आखणी झाली तेव्हाची आणि आत्ताची लोकवस्ती, उपनगरांची वाढती संख्या, लोकसंख्येचा चढता आलेख पाहता अगदी तीप्पटीहून अधिक बदल झाला आहे. शहराची वाढती गरज लक्षात घेऊन काळम्मावाडी थेट

योजना राबवण्यात येत आहे. अवाढव्य खर्चाची ही योजना कार्यान्वित झाली असली तरीही अनेक प्रश्न नियोजनाच्या पातळीवर प्रलंबित आहेत. शासकीय स्तरावर तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली या संपूर्ण योजनेच्या परिणामकारक अंमलबजावणी दृष्टीने विशेष प्रयत्न झाले तर काळम्मावाडी योजना कोल्हापूरकरांसाठी निश्चितपणे वरदायिनी ठरेल.

कोल्हापूर शहराचा विकास सुनियोजित आराखड्यानुसार होण्याच्या दृष्टीने शासनाच्या स्तरावर देखील विविध योजना सुरू आहेत. विशेषत: स्मार्ट सिटी ही कल्पना दीर्घकाळ विचाराधीन आहे. या अंतर्गत शहराचा चेहरामोहरा बदलण्याचा प्रयत्न होईल. शहराला सर्वांगीण, सर्वसमावेशक विकासाची दिशा देण्याच्या दृष्टीने ही संकल्पना उपयोगी ठरेल. कोल्हापूर शहरामध्ये अनेक शिक्षण संस्था आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर होत आहे. मुख्य म्हणजे पर्यावरणविषयक जाणिवा वाढविण्याच्या दृष्टीने शाळा, महाविद्यालयात गंभीरपणे प्रयत्न सुरू आहेत. सामाजिक बांधीलकीचे भान तरूणांमध्ये वाढीस लागावे याचाही प्रयत्न सर्व स्तरातून होतो. स्मार्ट सिटीची संकल्पना योग्य दिशेने कार्यरत राहिली तर नागरिकांच्या जीवनमानाचा दर्जा उंचावण्यास मदत होते. त्याचबरोबर उपलब्ध संसाधनांचा कार्यक्षमतेने वापर होण्यास मदत होते.

कोल्हापूर शहर आणि परिसर गतीने वाढतो आहे. स्वातंत्र्यानंतरच्या काळात या शहराने विविधांगी प्रगती केली. विकासाच्या प्रक्रियेत विविध टप्पे पार केले. असे असले तरी देशातील इतर शहरांच्या तुलनेत कोल्हापूर मागास राहिले ही वस्तुस्थिती आहे. तुलनेने नाशिक, औरंगाबाद, नागपूर या शहरांची प्रगती आश्चर्यकारक गतीने होत आहे. शासनाच्या पातळीवर निधीच्या पूर्ततेची हमी देण्यात येते पण हा निधी योग्य कारणांसाठी वापरण्यासाठीची राजकीय इच्छाशक्तीही फारशी जाणवत नाही. राज्यकर्त्यांनी आपली दृष्टी विकासाच्या दिशेने प्रगल्भ करायला हवी पण दुर्दैवाने असे होताना दिसत नाही. प्रशासनाच्या पातळीवर शक्य ते सर्व करण्याचा प्रयत्न होत असला तरी पायाभूत सुविधा आणि संसाधनांचा अधिकाधिक उपयोग करून घेण्याची मानसिकता समाजातील सर्व घटकांनी अंगीकारायला हवी. असे झाले तर कोल्हापूर शहर व जिल्ह्याचा परिसर आधुनिक काळातील नवनवीन आव्हानांना सामोरे जाण्यास अधिक सक्षम होईल.

**आधारभूत साधने :**


1) कोल्हापूर महानगरपालिका वार्षिक अहवाल.
2) विविध वृत्तपत्रांतील माहिती, संकलन.
3) कोल्हापूर जिल्हा सामाजिक-आर्थिक पाहणी अहवाल.
4) पर्यावरणवादी स्वयंसेवकांशी प्रत्यक्ष चर्चा.